ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

No,CGRF/AZ/ U / 222 / 2009 /56 Date :-

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Urban Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect Shri Banker Dinker Pandurang, Plot No.C-6, Gat No.88, Near Mahadeo Mandir, Ekta Colony, Satara Parisar Aurangabad. (Consumer no. 490011693161)*

Dear Sir,

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Banker Dinker Pandurang, Plot No.C-6, Gat No.88, Near Mahadeo Mandir, Ekta Colony, Satara Parisar Aurangabad.*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 30.06.2009 at 11= 30 Hrs.*

Encl: As above

Member/Secretary
CGRF(AZ) MSEDCL
Aurangabad.

Copy to:-
*Shri Banker Dinker Pandurang,*
*Plot No.C-6, Gat No.88,*
*Near Mahadeo Mandir,*
*Ekta Colony, Satara Parisar,*
*Aurangabad.*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२२२/२००९/५६**

**तक्रार दाखल दिनांक :- १६/०६/२००९**
**निकाल दिनांक :- २०/०७/२००९**

**श्री दिनकर पांडुरंग बनकर,**
**प्लॉट नंबर सी ६ गट नं. ८८,**
**महादेव मंदीराजवळ एकता कॉलनी,**
**सातारा परीसर, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११६९३१६१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**शहर विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक ०२/०६/२००९ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०९/०६/२००९ रोजी ठेवण्यात आली.

अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

१) अर्जदाराने घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांना जुन २००८ नंतर सरासरीवर व चुकीची मीटर रिडींगची नोंद घेवुन वीज बिल आकारणी करण्यात आली. अर्जदाराने या चुकीच्या वीज बिलाबाबत महावितरणच्या संबंधित विभागाकडे तक्रार केल्यानंतर देखील त्यांचा तक्रारीची दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली असुन सुधारीत वीज बिल देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक ३०/०६/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री दिनकर बनकर उपस्थित होते. महावितरणतर्फे नोडल अधिकारी म्हणुन श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. त्यांनी या प्रकरणाची कागदपत्रे संबंधीत विभागाकडुन उपलब्ध झाली नसल्याचे सांगत सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती केली. मंचाने अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत आदेश देत पुढील सुनावणी दिनांक १४/०७/२००९ रोजी ठेवण्यात आली.

३) दिनांक १४/०७/२००९ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी अर्जदारास देण्यात आलेले बिल चुकीचे असल्याचे मान्य करीत बिल रिव्हीजनचा प्रस्ताव मंचात दाखल केला व अर्जदारास दिनांक २७/०६/२००९ रोजी देण्यात आलेले २८२८०/- रुपयाचे बिल कमी करुन ते ११९८०/-देण्याचा प्रस्ताव मंजुसाठी दाखल केला.मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवले.

४) अर्जदार व महावितरणचे नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्राचे निरीक्षण केल्यावर असे आढळुन येते की, महावितरणतर्फे अर्जदारास मे २००८ पर्यंत मीटरवरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारण्यात येत होते त्याचा भरणा अर्जदाराने केलेला आहे.जुन २००८ नंतर मीटर वीज वापराची व्यवस्थीत नोंद घेत असतांना देखील महावितरणतर्फे सरासरीवर आधारीत बिल आकारणी करण्यात आली सप्टेंबर २००८ मध्ये चुकीची मीटर रिडींग घेवुन अर्जदारास वाढीव बिल देण्यात आले. अर्जदाराने या चुकीच्या बिलाबाबत महावितरणच्या छावणी उपविभागाकडे तक्रार केली पण त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराचे वीज बिल दुरुस्त करुन त्यांना ११९८०/- बिलाची आकारणीस मंजुरी देण्याचा प्रस्ताव मंचात दाखल केला आहे. या प्रस्तावाचे निरिक्षण केल्यावर तो योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास दिनांक २७/०६/२००९ रोजी दिलेले २८२८०/-रुपयाचे वीज बिल रद्द करण्यात येत असुन अर्जदारास ११९८०/- वीज बिल आकारणी करण्याबाबतचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास वरील प्रमाणे सुधारीत वीज बिल ३० दिवसात द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/२२२/२००९/५६** **दिनांक :-**

**प्रति,**

**श्री दिनकर पांडुरंग बनकर,**
**प्लॉट नंबर सी ६ गट नं. ८८,**
**महादेव मंदीराजवळ एकता कॉलनी,**
**सातारा परीसर, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११६९३१६१)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/२२२/२००९/५६ )

आपण दिनांक १६/०६/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**